# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नाशिक
## GOVERNMENT MEDICAL COLLEGE,NASHIK

हिं.वं.बा.ठा.रुग्णालय,बिटको रुग्णालयाचा पहिला मजला, राजवाडा नगर,देवळाली गांव-४२२ २१४.

Website : www.gmcnashik.edu.in E-mail deangmcnashik@gmail.com Tel : (0253) 2997296


जा.क्र. शावैमना/आस्था-१ व २/जाहिरात/अभ्यागत अध्यापक नियुक्ती/1150/२०२६ दि:29/०६/२०२६

वेबसाईटद्वारे प्रसिध्द (www.gmcnashik.edu.in)

## " जाहिरात "

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक येथील अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) म्हणुन नियुक्ती करणे बाबत..

संदर्भ :-१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांचा शासन निर्णय MEDD-१२०२१/३७/२०२४-MMD(Vais-२)/८७३८१२ दि.०३/०१/२०२५

२) राष्ट्रीय वैद्यक आयोग (NMC), मार्गदर्शक सूचना दि.१८/११/२०२१, दि.१४/०२/२०२२, दि.१६/०८/२०२३ व दि.३०/०६/२०२५

३) आयुक्त वै.शि.यांचे पत्र क्र.व्हीजीटींग/संवैशिवसं/फॅकल्टी नियुक्ती/क/१/८७/२०२५, दि.११/०२/२०२६

४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक MEDD-१२/२६/२०२६-MMD(Vais-२)/१५७४७९१, दि.१३/०३/२०२६

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन-१,२,३ व ४ च्या अन्वये राष्ट्रीय वैद्यक आयोगाने दि.१४/०८/२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप मार्गदर्शक सुचनान्वये अभ्यागत अध्यापक (व्हीजीटींग फॅकल्टी) नियुक्त करण्याबाबत निकष निश्चित करण्यात येऊन अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) नियुक्त करण्याबाबत निर्देश दिले आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भाधिन-४ च्या मा.शासन आदेशान्वये राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) नियुक्ती करण्यात मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक या संस्थेतील प्रवेशित एमबीबीएस विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रातील नामांकित तज्ञ अध्यापक यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा/अनुभवाचा अध्यापनासाठी निश्चितच फायदा होईल या दृष्टीने वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) म्हणुन अर्धवेळ तत्वावर एक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात उपरोक्त संदर्भाधिन-४ च्या शासन निर्णयातील प्रचलित नियमानुसार तसेच राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या निकषानुसार पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी | दि.०९/०७/२०२६ ते दि.१६/०७/२०२६<br>सकाळी ११.०० ते सायं. ०५.०० वाजेपर्यंत. |
| २) | मुलाखतीचा दिनांक | दि.२१/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता. |
| ३) | मुलाखतीचे ठिकाण | अधिष्ठाता यांचे कार्यालय, हिंदुह्रदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे बिटको रुग्णालय, पहिला मजला, राजवाडा नगर, देवळाली गांव-४२२ २१४. |

इच्छुक उमेदवारांनी या कार्यालयाच्या (www.gmcnashik.edu.in) या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीसोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज उपलब्ध (Download) करुन घ्यावा. तसेच सदरील अर्ज परिपुर्ण भरुन त्यासोबत आवश्यक ते सर्व शैक्षणीक अर्हतेचे कागदपत्र/प्रमाणपत्राच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात व उमेदवारांनी अर्ज हिंदु हदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे, बिटको रुग्णालय, पहिला मजला मुक्तीधाम जवळ, राजवाडा नगर, देवळाली गाव- ४२२२१४ येथे आवक-जावक शाखेस प्रत्यक्ष किंवा या संस्थेच्या **deangmcnashik@gmail.com** या ई-मेल आयडीवर विहित मुदतीत सादर करावा. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह व साक्षांकित केलेल्या प्रतीसह स्वखर्चाने उपस्थित रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवाराचा नियुक्तीकरीता विचार केला जाणार नाही.

(पान क्र.०२ वर)

## अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) रिक्त पदांची माहिती खालील प्रमाणे

| अ.क्र | विषयाचे नाव (Name of Subject) | रिक्त पदे (Vacant Post) | शैक्षणिक अर्हता (Educational Qualification) | अनुभव (Experience) |
|---|---|---|---|---|
| १. | शरिररचनाशास्त्र (Anatomy) | १ | **MD/MS/DNB in the concerned subject.** MSc (Medical Anatomy) with PhD Medical Anatomy | **8 year post PG experience** |
| २. | जीवरसायनशास्त्र (Biochemistry) | १ | **MD/MS/DNB in the concerned subject.** MSc (Medical Biochemistry) with PhD in Medical Biochemistry | |
| ३. | त्वचा व गुप्तरोगशास्त्र (Dermatology) | १ | MD/DNB (DVL) | |

उक्त नमूद दर्शविलेल्या विविध विषयातील अध्यापक यांची अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) म्हणुन नियुक्ती ही राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या नमुद मार्गदर्शक सुचनानुसार वरील सर्व पदांसाठी जाहीर केलेल्या पदासाठी उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहे. तक्त्यात नमुद केलेल्या पदसंख्येत प्रशासकीय कारणास्तव बदल करण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. वरील तक्त्याप्रमाणे पदांच्या उपलब्धतेनुसार आवश्यक अर्हता धारण करणा-या उमेदवारांची संस्थास्तरावर मा.अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत मुलाखत घेण्यात येऊन मुलाखतअंती निवड करण्यात आलेल्या उमेदवारांचे आदेश मा.संचालनालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार/मान्यतेनुसार या संस्थेच्या स्तरावर निर्गमित करण्यात येतील.

उमेदवारांची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरील अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) म्हणुन अध्यापक पदांकरीता नियुक्ती कालावधी सुरुवातीला एका वर्षासाठी असेल, मा.अधिष्ठाता हा कालावधी आणखी एका वर्षासाठी वाढवू शकतात. दोन वर्षांचा कार्यकाळ संपल्यानंतर, नवीन निवड प्रक्रियेद्वारे पुन्हा नियुक्तीचा विचार केला जाऊ शकतो. मुदतवाढीसाठी विद्यार्थ्यांचा अभिप्राय (Feedback) विचारात घेतला जाईल. अध्यापकांची कामगिरी समाधानकारक नसल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

अटी व शर्ती :-

१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक या संस्थेतील प्रथम वर्ष व द्वितीय वर्षातील मंजुर असलेल्या विविध विषयातील पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या अध्यापनाची गुणवत्ता आणि व्यापकता वाढवण्यासाठी, वैद्यकीय महाविद्यालये "अभ्यागत अध्यापक" म्हणून अर्धवेळ तत्त्वावर अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) म्हणुन नियुक्ती करण्यात येत असुन आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी, भारत आणि परदेशातील नामांकित संस्थांमधील पात्र तज्ञ या पदासाठी अर्ज करु शकतात.

२) उपरोक्त संबधित विषयातील अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) यांना उपरोक्त दि.१३/०३/२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रति सत्र रु.१०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) व कमाल मासिक मानधन रु.२४,०००/- (अक्षरी रुपये चोवीस हजार फक्त) इतके अनुज्ञेय राहील. याकरीताचा खर्च हा संस्थेच्या स्वीय प्रपंजी खात्यातुन (PLA) करण्यात येईल. सदरील अध्यापकांना एकत्रित मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही भत्ते लागू राहणार नाहीत.

३) अभ्यागत अध्यापकाकडे संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी आणि पदवी प्राप्त केल्यानंतर किमान ८ वर्षांचा कामाचा अनुभव असावा. तसेच जे अध्यापक पदव्युत्तर पदवी आणि पदवी या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातुन/इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातुन/मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय/एनबीईएमएस संस्थेतुन उत्तीर्ण झाले असल्यास सदरील अध्यापकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. सदरील अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) म्हणुन नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा कमाल ७० वर्षे असेल.

४) गुणवत्ता यादी ही उपरोक्त नमुद केलेल्या संबधित विषयातील शैक्षणिक अर्हतेचे गुण व मुलाखतीत प्राप्त झालेले गुण अशा एकत्रित गुणांवर ठरविण्यात येईल. तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

५) जाहिरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेले आहेत.

६) उमेदवार या महाविद्यालयाव्यतीरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे “ना-हरकत प्रमाणपत्र” अर्जासोबत जोडावे.

७) ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असतांना सतत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८) अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) यांचा नियुक्तीचा कालावधी: सुरुवातीला एका वर्षासाठी असेल. अधिष्ठाता हा कालावधी आणखी एका वर्षासाठी वाढवू शकतात. दोन वर्षांचा कार्यकाळ संपल्यानंतर, नवीन निवड प्रक्रियेद्वारे पुन्हा नियुक्तीचा विचार केला जाऊ शकतो. मुदतवाढीसाठी विद्यार्थ्यांचा अभिप्राय (Feedback) विचारात घेतला जाईल. असमाधानकारक काम किंवा गैरवर्तणुकीच्या बाबतीत सेवा समाप्त केली जाऊ शकते.

९) आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील. तसेच याबाबत उमेदवारांना न्यायालयात जाता येणार नाही.

१०) मुलाखतीस उपस्थित राहण्याकरिता आपणास कोणत्याही प्रकारचा प्रवास व दैनंदिन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

११) (अ) प्रथम द्वितीय व तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. तसेच एम.डी., एम.एस.डी.एम., एमसी.एच.किंवा समतुल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे गुणपत्रिका नसल्यास परीक्षा पॉईट, ग्रेड प्रमाणपत्र. (ब) सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रिका व NMC च्या मानंकानुसार एमएस्सी पीचडी पदवी तसेच एसएससी व एचएससी प्रमाणपत्र/गुणपत्रिका (क) एम.एम.सी. किंवा एम.सी.आय. नुतनीकरण केलेली नोंदणी प्रमाणपत्र व अनुभव प्रमाणपत्र (ड) MET & BCBR प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य (इ) पॅनकार्ड व आधारकार्डची छायाप्रत इत्यादी कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

(डॉ.व्यकंट शाहुबाई अर्जुनराव गिते)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक

प्रति,

१) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण संशोधन व आयुष, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२) उपरोक्त संबंधित सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक

३) सूचना फलक:- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नाशिक

४) अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

शिक्षक पात्रता नियम (Teachers Eligibility Qualification) (TEQ Regulations १४/०८/२०२१)'

## अभ्यागत अध्यापक (Visiting Faculty) नियमावली

**१. उद्देश:-** पूर्व-वैद्यकीय (pre-clinical), निम-वैद्यकीय (para-clinical) आणि वैद्यकीय (clinical) विभागांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या अध्यापनाची गुणवत्ता आणि व्यापकता वाढवण्यासाठी, वैद्यकीय महाविद्यालये "अभ्यागत अध्यापक" म्हणून अर्धवेळ तत्त्वावर अतिरिक्त प्राध्यापकांची नियुक्ती करू शकतात. आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी, भारत आणि परदेशातील नामांकित संस्थांमधील पात्र तज्ज्ञांचीही या पदावर नियुक्ती केली जाऊ शकते.

**२. अभ्यागत/मानद अध्यापक:-** हे अध्यापक "वार्षिक एमबीबीएस प्रवेश नियम, २०२०" आणि "पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण नियम, २०२१" मध्ये विहित केलेल्या किमान आवश्यक प्राध्यापक संख्येव्यतिरिक्त असतील.

**३. पात्रता आणि अनुभव:-** अभ्यागत अध्यापकाकडे संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी आणि पदवी प्राप्त केल्यानंतर किमान ८ वर्षांचा कामाचा अनुभव असावा. या पदासाठी वयोमर्यादा कमाल ७० वर्षे असेल.

**४. कमाल मर्यादा:-** एखाद्या विभागातील अभ्यागत अध्यापकांची संख्या, त्या विषयासाठी विहित केलेल्या एकूण मंजूर प्राध्यापक संख्येच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त नसावी.

**५. निवड प्रक्रिया:-** निवड समितीमध्ये महाविद्यालयाचे अधिष्ठाता/संचालक (अध्यक्ष), संबंधित विभागाचे प्रमुख, दुसऱ्या विभागाचे प्रमुख आणि शहराबाहेरील किमान एक विषयतज्ज्ञ यांचा समावेश असेल. खाजगी आरोग्य सेवा, निमशासकीय संस्था किंवा निवृत्त कर्मचाऱ्यांचा यात विचार केला जाऊ शकतो, ज्यांना शिकवण्यात रस आहे.

**६. नियुक्तीचा कालावधी:-** सुरुवातीला ही नियुक्ती एका वर्षासाठी असेल. अधिष्ठाता हा कालावधी आणखी एका वर्षासाठी वाढवू शकतात. दोन वर्षांचा कार्यकाळ संपल्यानंतर, नवीन निवड प्रक्रियेद्वारे पुन्हा नियुक्तीचा विचार केला जाऊ शकतो. मुदतवाढीसाठी विद्यार्थ्यांचा अभिप्राय (Feedback) विचारात घेतला जाईल. असमाधानकारक काम किंवा गैरवर्तणुकीच्या बाबतीत सेवा समाप्त केली जाऊ शकते.

**७. कामाची व्याप्ती:-** प्रत्येक अभ्यागत अध्यापकाने महिन्यातून किमान ४ सत्रे (Sessions) घेणे आवश्यक आहे. प्रत्येक सत्र किमान ३ तासांचे असावे. त्यांना विभागाच्या दैनंदिन प्रशासकीय कामात समाविष्ट केले जाणार नाही.

**८. मानधन:-** महाविद्यालय अभ्यागत अध्यापकांना मानधन देऊ शकते.

**९. इतर:-** अभ्यागत अध्यापकांची माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (Website) प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. नियमांनुसार आवश्यक असलेल्या किमान प्राध्यापक संख्येच्या गणनेत या अध्यापकांना धरले जाणार नाही.

**१०. विशेष शाखा/विषयांची नामकरण पद्धत,** शक्यतोवर, पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण विनियम, २०२१ मध्ये समाविष्ट असलेल्या नामकरण पद्धतीप्रमाणेच असेल. पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण विनियम, २०२१ मध्ये कोणत्याही नवीन विशेष शाखेचा समावेश झाल्यास, या विनियमांमधील संबंधित तक्त्यामध्ये देखील त्याचा समावेश केला जाईल.

११. वैद्यकीय संस्थेतील विभागात वैद्यकीय पात्रता असलेल्या प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी अध्यापनाचे विशेषीकरण आणि पूर्व पात्रता, व्यापक विशेषीकरणांसाठी तक्ता ११ अ मध्ये आणि अतिविशेषीकरणांसाठी तक्ता ११.८ मध्ये दिल्याप्रमाणे असेल.

# OFFICE OF THE DEAN GOVERNMENT MEDICAL COLLEGE, NASHIK

**APPLICATION FOR THE POST OF** ---------------------------------------------------------------------------

Passport Size Photo

**To,**
**The Dean**
**Government Medical College**
**Nashik**

1. Name in Full (In Block Letter) ……………………………………………………………………………
2. Place and Date of the Birth ……………………………………………………………………………
3. Caste & Category ……………………………………………………………………………
4. Permaanent Registration Number (MMC/MCI/NMC) ………………………………………………………………
5. Education Qualification ……………………………………………………………………………

| Sr.No. | Name of Examination | Subject/Discipline/ specialty | University/Institute/ college | Whether Government Or Private | Month & Year of Passing Final Examination | Number of Attempts |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | MBBS | | | | | |
| 2. | MD/MS/Diploma | | | | | |
| 3. | Any Other | | | | | |
| 4. | BCBR | | | | | |
| 5. | MET | | | | | |

6. Internship complection (Cert.Must be attached) From :- ……………………… To ………………………

7. Experience :- (Cert.Must be attached)

| Sr.No. | Post Held | Name Of Institution | Total Period in Years |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

(Exp.Cert/Co-Counsaltant Exp.Cert.Must be attached)

1. Details of Indexed Publication
   Number:- Type

2. Wheather bonded/non-bonded canditate...............................with due bond period....................

3. Academic Details :-

| Academic Year | Mark Obtained | Total Marks | Percentage | Attempts |
|---|---|---|---|---|
| SSC (10th) | | | | |
| HSC (12th) | | | | |
| MD/MS/Diploma Marks | | | | |
| I MBBS | | | | |
| II MBBS | | | | |
| III/I MBBS | | | | |
| III/II MBBS | | | | |
| Any Other | | | | |

(All Marksheet/Board & Degree Cert.Must be attached)

1. Permanent Address

   ......................................................................................................................................................

   ..........................................................................................Mobile No...........................................

   Email:-..............................................................................

**Place :-**

**Date :-** **Signature of Applicant & Date**

**DECLARATION**

**The information furnished in this application form is complete and correct to the best of my knowledge and any proof contrary to this will make me liable for necessary disciplinary action.**

**Signatue of Applicant & Date**